Review Of Research
ISSN 2249-894X

Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 4 | Issue - 12 | Sept - 2015

# वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रम: एक अध्ययन




**प्रा. भास्कर जे. वाळके**
लोक महाविद्यालय, जि. वर्धा.



## साराश

भारतात गावपातळीवर गावपंचायती ह्या अस्तित्वात होत्या. पुढे काळानुसार त्यात बदल होत गेले. आज त्याच परंपरागत गावपंचायतींच्या उद्देशांवर आधारित; परंतु कायद्याचे चौकटीत कारभार चालवणाऱ्या आहेत. पंचायत राज अंतर्गत महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायत व्यवस्था स्वीकारण्यात आली आहे. या व्यवस्थेत स्थानिक लोकांच्या हाती सत्ता देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे वर्धा जिल्ह्यापुरते मर्यादीत असून वर्धा जिल्हा परिषदेची भूमिका व योगदान याचे अध्ययन करण्यात आला आहे.

## प्रस्तावना

भारताची ७० टक्के लोकसंख्या खेडेगावात वसलेली आहे. म्हणजेच भारत हा खऱ्या अर्थाने खेड्यात वसलेला देश आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्वप्न होते की, खेडी सुधारली तर लोक सुधारतील व खेड्यांचा विकास होईल. खेड्यांचा विकास हाच खऱ्या अर्थाने राष्ट्राचा विकास व प्रगती होय.

विकसित देशांच्या रांगेत यायला भारत अजूनही मागे आहे. येथील ग्रामीण भागाची स्थिती अजूनही पाहिजे त्या प्रमाणात विकसित झाली नाही. ग्रामीण विकासासाठी जिल्हा परिषदेमार्फत विविध योजना राबविल्या जातात. ह्या योजनांमुळे ग्रामीण विकास होणे अपेक्षित आहे. त्याला चालना मिळाली का? ज्या अर्थी भारताने लोकशाही राज्य पद्धतीचा अंगीकार केला आहे त्या अर्थी शासन व प्रशासनात मोठ्या प्रमाणात जनतेचा सहभाग असणे अभिप्रेत आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने पंचायत राज संस्थेत लोकांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे. लोक सहभागाशिवाय विकास शक्य नाही, हे स्वतंत्र भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या मूल्यमापनातून स्पष्ट झाले आहे. तेव्हा पंचायत राज व्यवस्थेत लोक सहभागाचा देखील आढावा घेणे गरजेचे आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी पंचायत राज पद्धत आपण स्वीकारली आहे. ह्या पद्धतीमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होणे अपेक्षित आहे. नियोजनात व निर्णय प्रक्रियेत स्थानिक लोक व लोकप्रतिनिधींचा सहभाग असायला पाहिजे. तो कितपत असतो आणि त्यामुळे लोकांना त्यांचे गरजेनुसार कामे निवडण्याचे स्वातंत्र्य मिळाले का? जिल्हा परिषदेच्या कामकाजात आलेली पारदर्शकता, गुणवत्ता व गतीमानता याचे मूल्यमापन होणे आवश्यक वाटते. पंचायत राज संस्थांच्या कार्याला चालना मिळण्यासाठी शासनाचे योगदान व या संस्थांच्या सक्षमीकरणासाठी शासनाचे प्रयत्न याचाही आढावा तेवढाच महत्वाचा आहे. शासनाने काही अधिकार व निधी स्थानिक लोकांच्या हवाली करून विकासकामांची जबाबदारी स्थानिक लोकांवर सोपविली आहे. त्यामुळे विकासाचे कार्यक्रम हे लोकांचेच आहेत, अशी भावना लोकांमध्ये निर्माण होणे अपेक्षित आहे. लोकशाही मजबूत होण्यासाठी ह्याचा देखील शोध घेणे तितकेच महत्वाचे आहे.

**सारणी १ :वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना, उपक्रम याची तुम्हाला माहिती असण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया**

| | लाभार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ७२ | ३६.० |
| अंशत: होय | ९८ | ४९.० |
| नाही | ३० | १५.० |
| सांगता येत नाही | | |
| **एकूण** | **२००** | **१००.०** |

वरील सारणी क्र. १ मध्ये वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना, उपक्रम याची माहिती असण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ३६ टक्के उत्तरदात्यांना वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना, उपक्रम याची माहिती असून ४९ टक्के उत्तरदात्यांना वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना, उपक्रम याची अंशत: माहिती असल्याचे आढळले. तसेच वरील विधानासंबंधी 'नाही' ही प्रतिक्रिया नमूद करणाऱ्या उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण १५ टक्के असल्याचे आढळले.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश लाभार्थ्यांना वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना, उपक्रम याची अंशत: माहिती आहे.

**सारणी २ :पंचायत राज योजना खरोखर ग्रामविकासाला पोषक आहेत, असे वाटण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया**

| | लाभार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १४४ | ७२.० |
| अंशत: होय | ४८ | २४.० |
| नाही | ६ | ३.० |
| सांगता येत नाही | २ | १.० |
| **एकूण** | **२००** | **१००.०** |

वरील सारणी क्र. २ मध्ये पंचायत राज योजना खरोखर ग्रामविकासाला पोषक आहेत, असे वाटण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ७२ टक्के उत्तरदात्यांना पंचायत राज योजना खरोखर ग्रामविकासाला पोषक आहे, असे वाटत असून २४ टक्के उत्तरदात्यांना पंचायत राज योजना खरोखर ग्रामविकासाला पोषक आहे, असे अंशत: वाटत असल्याचे आढळले. तसेच वरील विधानासंबंधी नाही व सांगता येत नाही, ही प्रतिक्रिया नमूद करणाऱ्या उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे केवळ ३ टक्के व १ टक्के असल्याचे आढळले.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश लाभार्थ्यांना पंचायत राज योजना खरोखर ग्रामविकासाला पोषक आहे, असे वाटते.

**सारणी ३ :वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे ग्रामीण विकास झाला असण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया**

| | लाभार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ८८ | ४४.० |
| अंशत: होय | १०२ | ५१.० |
| नाही | ८ | ४.० |
| सांगता येत नाही | २ | १.० |
| **एकूण** | **२००** | **१००.०** |

वरील सारणी क्र. ३ मध्ये वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे ग्रामीण विकास झाला असण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ४४ टक्के उत्तरदात्यांना वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे ग्रामीण विकास झाला आहे, असे वाटत असून ५१ टक्के उत्तरदात्यांना

वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे अंशत: ग्रामीण विकास झाला, असे वाटते. तसेच ४ टक्के उत्तरदात्यांना वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे ग्रामीण विकास झाला, असे वाटत नसून वरील विधानासंबंधी 'सांगता येत नाही' हे नमूद करणाऱ्या उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण केवळ १ टक्के असल्याचे आढळले.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश लाभार्थ्यांना वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे ग्रामीण विकास झाला आहे, असे अंशत: वाटते.

**सारणी ४:योजनांची मंजुरी मिळण्यापासून ती पूर्ण होऊन ती जनतेच्या सेवेत पोहोचेपर्यंतची पूर्ण प्रक्रिया सुरळीत व वेळेत पार पडते या विधानासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांचे मत**

| | लाभार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४२ | २१.० |
| अंशत: होय | ६६ | ३३.० |
| नही | ८४ | ४२.० |
| सांगता येत नाही | ८ | ४.० |
| **एकूण** | **२००** | **१००.०** |

वरील सारणी क्र. ४ मध्ये योजनांची मंजुरी मिळण्यापासून ती पूर्ण होऊन ती जनतेच्या सेवेत पोहोचेपर्यंतची पूर्ण प्रक्रिया सुरळीत व वेळेत पार पडते या विधानासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांचे मत दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २१ टक्के उत्तरदाते योजनांची मंजुरी मिळण्यापासून ती पूर्ण होऊन ती जनतेच्या सेवेत पोहोचेपर्यंतची पूर्ण प्रक्रिया सुरळीत व वेळेत पार पडते या विधानासंबंधी सहमत असून ३३ टक्के उत्तरदाते अंशत सहमत आहेत. तसेच ४२ टक्के उत्तरदाते योजनांची मंजुरी मिळण्यापासून ती पूर्ण होऊन ती जनतेच्या सेवेत पोहोचेपर्यंतची पूर्ण प्रक्रिया सुरळीत व वेळेत पार पडते या विधानासंबंधी 'नाही' ही प्रतिक्रिया नमूद करीत असून वरील विधानासंबंधी 'सांगता येत नाही' ही प्रतिक्रिया नमूद करणाऱ्या उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण केवळ ४ टक्के असल्याचे आढळले.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश लाभार्थी योजनांची मंजुरी मिळण्यापासून ती पूर्ण होऊन ती जनतेच्या सेवेत पोहोचेपर्यंतची पूर्ण प्रक्रिया सुरळीत व वेळेत पार पडते, या विधानाशी सहमत नाहीत.

**सारणी ५:योजना रखडण्याला जबाबदार असणाऱ्या व्यक्तींसंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांची माहिती**

| | लाभार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| शासन | ३८ | १९.० |
| प्रशासन | १०६ | ५३.० |
| लोकप्रतिनिधी | ३० | १५.० |
| नोकरशाही | २६ | १३.० |
| **एकूण** | **२००** | **१००.०** |

वरील सारणी क्र. ५ मध्ये योजना रखडण्याला जबाबदार असणाऱ्या व्यक्तींसंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९ टक्के उत्तरदात्यांच्या मते योजना रखडण्याला शासन जबाबदार असून ५३ टक्के उत्तरदात्यांच्या मते योजना रखडण्याला प्रशासन जबाबदार आहे. तसेच १५ टक्के व १३ टक्के उत्तरदात्यांच्या मते योजना रखडण्याला अनुक्रमे लोकप्रतिनिधी व नोकरशाही जबाबदार असल्याचे आढळले.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश लाभार्थ्यांच्या मते योजना रखडण्याला प्रशासन जबाबदार आहे.

## निष्कर्ष

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश अधिकाऱ्यांना वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना, उपक्रम याची माहिती आहे.

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश अधिकाऱ्यांना पंचायत राज योजना खरोखर ग्रामविकासाला पोषक आहे, असे वाटते.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश अधिकाऱ्यांना वर्धा जिल्हा परिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे अंशत: ग्रामीण विकास झाला, असे वाटते.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश अधिकारी योजनांची मंजुरी मिळण्यापासून ती पूर्ण होऊन ती जनतेच्या सेवेत पोहोचेपर्यंतची पूर्ण प्रक्रिया सुरळीत व वेळेत पार पडते, या विधानाशी अंशत: सहमत आहेत.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश अधिकाऱ्यांच्या मते योजना रखडण्याला लोकप्रतिनिधी जबाबदार आहे.

## संदर्भ ग्रंथसूची

१. डॉ. अरुणा कुमार श्रीवास्तव, भारत मे पंचायतीराज, आर.बी.एस.ए. पब्लिशर्स, जयपूर १९९४, पृ.क्र. ९.
२. डॉ. सत्यकेतू विद्यालंकार, मौर्य साम्राज्य का इतिहास, भारतीय प्रेस, इलाहाबाद, १९२८, पृ.क्र. २१०,२११.
३. श्री. तेजमल दलक, भारत मे लोकतांत्रिक विकेंद्रीकरण, अजमेर, १९६१, पृ.क्र. ३७—३८.
४. डॉ. हरिशचंद्र शर्मा, भारतमे स्थानीय प्रशासन, कॉलेज बुक डेपो, जयपूर, पृ.क्र.१५.
५. पंडित जवाहरलाल नेहरू; अनुवाद: साने गुरूजी, ना. वि. करंदीकर, भारताचा शोध, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे ३३४ ते ३३६.
६. पंचायत राज समिती रिपोर्ट, भारत सरकार, नई दिल्ली १९७८. कृषि व सिंचाई मंत्रालय, ग्राम विकास विभाग भारत सरकार, १९७८. पृ.क्र. ६.
७. राजाराम: लोकशाहीची नवी क्षितीजे, पुणे सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे. १९७०.
८. गुरूनाथ नडगोंडे : ग्रामीण समाजशास्त्र, कांटिनेंटल प्रकाशन, पुणे. १९७६.
९. डॉ. नीलम गोऱ्हे : पंचायतराज मार्गदर्शक, स्त्री आधार केंद्र, पुणे. १९९८.
१०. ग्राम विकास विभाग : ग्राम विकासाची दिशा आणि पंचायत राज प्रशासन, राज्य कृती आराखडा, ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई.
११. यशदा, पुणे : विकास आणि पंचायतराज
१२. यशदा, पुणे : पंचायतराज आणि रोजगार.
१३. यशदा, पुणे : विकेंद्रित नियोजन.